# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com

जा.क्र.गों.वि./परिक्षा वि./३१७१ /२०२१

दिनांक :२८/१०/२०२१

## अधिसुचना

**विषयः– समाजकार्य महाविद्यालयातील M.S.W या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता प्रवेशपुर्व सामाईक (CET) परीक्षेबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत M.S.W समाजकार्य या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याच्या अनुषंगाने नोंदणी केलेल्या व प्रकाशित यादीतील ज्यांचे अर्ज पात्र झालेले अशा सर्व पदवीधर विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **M.S.W** अभ्यासक्रमात प्रवेशाकरीता दि.०२/११/२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर व महिला महाविद्यालय, गडचिरोली या परीक्षा केंद्रामधुन परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या ई–मेल वर हॉल तिकीट उपलब्ध करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी हॉल तिकिट वर फोटो चिटकवून सही करावी तसेच सोबत ओळखपत्र बाळगावे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अर्जावर नोंद केलेल्या पत्त्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील विद्यार्थ्यांकरीता तसेच इतर जिल्हयातील विद्यार्थ्यांकरीता चंद्रपूर येथील आणि गडचिरोली जिल्हयातील विद्यार्थ्यांकरीता गडचिरोली येथील परीक्षा केंद्र देण्यात येईल. विद्यार्थ्यांना काही अडचण उद्‌भवल्यास ८२७५६८२३००/७७७४०५९३३५/९४०४१२४६७८ या नंबरवर संपर्क करावा.

28/10/2021

(डॉ. अनिल झेड.चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थ्यासाठी परीक्षेसंदर्भातील सुचना

## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली एम.एस. डब्लु प्रवेश परिक्षा मंगळवार दिनांक.02/11/2021

1. परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्ष खुले केले जातील. जेणेकरुन COVID-19 साठी प्रतिबंधात्मक उपायांची तंतोतंत अंमलबजावणी करता येईल. परीक्षा सुरु झाल्यावर विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.
2. आसन क्रमांकासहीत बैठक व्यवस्था प्रत्येक विद्यार्थ्याला उपलब्ध करुन देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आसन क्रमांक तपासूनच आपल्या आसन क्रमांकाप्रमाणे परीक्षेसाठी बसावयाचे आहे. एका बाकावर एकाच विद्यार्थ्याने बसायचे आहे. परंतु, 12 फुटी बाकावर 2 विद्यार्थ्यांना बसण्यास परवानगी आहे.
3. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या बुकलेटचे सील सकाळी 10.30 वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही.
4. कोणत्याही विद्यार्थी/विद्यार्थ्याने आपला भ्रमणध्वनी क्रमांक किंवा इतर कोणत्याही ओळखीसंबंधीची खूण उत्तरपत्रिकेवर नमूद केल्यास, सदर विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना सदर परीक्षेसाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याच्या नियमानुसार अपात्र ठरविण्यात येईल.
5. प्रत्येक विद्यार्थ्याने आपला बॉल पेन (निळा/काळा) आणणे आवश्यक आहे. परीक्षेदरम्यान कॅलक्यूलेटर व लॉग टेबल इत्यादी वापरण्याची परवानगी नाही. तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणे उदा. सेल्युलर, मोबाईल, सॅटेलाईट फोन, पेजर इत्यादी परीक्षा हॉलमध्ये नेण्यास मनाई आहे.
6. परीक्षेसंबंधी सूचना देणाऱ्या बेलचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.
   - परीक्षा सुरु होण्यापूर्वी 60 मिनिटे
   - परीक्षा सुरु होताना
   - पेपर समाप्तीच्या वेळी
7. परीक्षा कक्षामध्ये विद्यार्थ्यांनी धूम्रपान, चहा व इतर खाद्यपदार्थांचे सेवन करु नये.
8. कोणत्याही विद्यार्थ्याने परीक्षेच्या वेळी कॉपी किंवा इतर कोणत्याही गैरमार्गाचा वापर केल्यास, अपात्र ठरविण्यात येईल.
9. विद्याथ्याने ऑनलाईन परीक्षेच्या फॉर्ममध्ये दिलेल्या माहितीत कुठलाही बदल केला जाणार नाही.
10. पर्यवेक्षक, अधिक्षक, निरीक्षक यांनी मागणी केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.
11. अंध विद्यार्थ्यासह विकलांग वर्गातील (40% किंवा त्यापेक्षा जास्त अंध/विकलांग) विद्यार्थ्यासाठी स्वतंत्रपणे **30** मिनिटे अधिक वेळ देण्यात येईल. याकरीता स्वतःसोबत सिव्हल सर्जन **(जिल्हा शल्य चिकित्सक)** यांचा दाखला असणे आवश्यक आहे.
12. सदर परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवास भत्ता व इतर कुठलेही भत्ते दिल्या जाणार नाही.
13. जर इंग्रजी किंवा मराठी भाषेच्या भाषांतरामध्ये काही तफावत असल्यास इंग्रजी भाषेतील मजकूर/अर्थ ग्राहय धरण्यात येईल.
14. प्रत्येक प्रश्नासाठी **ए. बी. सी. डी.** या प्रमाणे चार पर्याय उत्तरासाठी दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायामधून बरोबर असलेला उत्तरावर √ खुन करावी.
15. सर्व नोंदी या दिलेल्या जागेतच मर्यादित ठेवण्यात याव्यात. विद्यार्थ्याने योग्य ती खुण काळया /निळया बॉल पॉईंट पेनने स्पष्टपणे करावी.
16. उत्तराकरीता दुरुस्तीसाठी पांढरी शाही ( white fluid ink) किंवा अन्य शाही वापरण्यास परवानगी नाही.
17. प्रश्नपत्रिकेतच दिलेल्या ठिकाणी (□) उत्तरे द्यावीत. या व्यतिरिक्त इतर ठिकाणी ( √ ) केल्यास उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही. विद्यार्थ्यांनी पूर्ण विचाराअंती उत्तरपत्रिकेवर उत्तरे द्यावीत. एकदा उत्तर दिल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही. एकापेक्षा अधिक उत्तरे देण्याची परवानगी नाही. खाडाखोड करुन बरोबर केलेल्या उत्तराचा विचार केला जाणार नाही.

**The Marking system for the MSW-Common Entrance Test (CET) shall be as given below:**

**Syllabus for CET (Total Marks-75)**

| **MSW-Common Entrance Test (CET) 75 Marks** | |
|---|---|
| **Aptitude Test for 50 Marks** | **Social Work Subject Test for 25 Marks** |
| 1 | 2 |
| Marks Scored in written examination based on GK,IQ, Mental Ability, Logical reasoning, current affairs, mathematical ability etc. | Written examination based on Subject like;<br>-Social Reform ,<br>-Social Movement,<br>-Human Right,<br>-Social Work Philosophy and<br>-Corporate Social Responsibility |